सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

वित्त व लेखा विभाग

परिपत्रक क्र.७४९/२०२३

विषय : विद्यापीठाच्या अर्थसंकल्पानूसार अर्थतरतूदींचा योग्य विनियोग/नियोजनाबाबत...

या परिपत्रकाद्वारे मा. विभागप्रमुख, प्रशासकीय शाखाप्रमुख व सर्व संबंधितांना यांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्पातील 'विकास' अर्थशिर्षातर्गत (Non-recurring) येणा-या तरतुदीमधून व आर्थिक वर्षअखेर कालावधी संपत असलेल्या योजनांमधून होणा-या खर्चासाठीची प्रक्रिया दि. १५ जानेवारी, २०२४ पूर्वी पूर्ण करावी.

मा. अधिसभेने अर्थसंकल्प देखरेख समिती गठीत केलेली असून या समितीने आपले कामकाज सुरु केलेले आहे. समितीच्या झालेल्या पहिल्या सभेमध्ये विद्यापीठाच्या खरेदी संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) 'विकास' अर्थशिर्षातर्गत येणारी खरेदी व्यवहाराची सुरुवात साधारण: ०१ ऑगस्ट, २०२३ पासून सुरु करण्यात यावी, त्यासाठी विभागीय समितीची बैठक घेऊन आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये दिलेल्या अर्थतरतूदीमध्ये कोणती शास्त्रीय सामग्री व उपकरणे/कार्यालयीन साधने व उपकरणे घ्यावयाची याची निश्चिती करावी.

२) **प्रशासकीय व वित्तीय मंजूरी :**
'विकास' अर्थशिर्षातर्गत जी खरेदी करावयाची आहेत, त्याची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी ३० ऑगस्ट, २०२३ च्या अखेरपर्यंत घ्यावी.

३) **निविदा/दरपत्रके मागविणे व छाननी करणे - ३० सप्टेंबर, २०२३ :**
३० ऑगस्ट, २०२३ नंतर त्या संदर्भातील सर्व निविदा, दरपत्रके मागवावित व त्याची छाननी करुन खरेदी आदेश तयार करावेत.

४) विद्यापीठाने तयार केलेल्या खरेदी नियमावली (Purchase Procedure) नुसार तांत्रिक सल्ला समिती (Technical Advisory Committee) समोर सदर खरेदी आदेश खरेदी समितीच्या सभासदाच्या उपस्थितीत शिफारस करुन घ्यावे.

५) **खरेदी आदेश पुरवठाधारकांना देणे - ३१ ऑक्टोबर, २०२३ :**
खरेदी आदेश १ लाख ते ५ लाखापर्यंत असतील तर तांत्रिक सल्ला समितीची शिफारशीनुसार इतिवृत्त तयार करुन वित्त व लेखा विभागाच्यामार्फत मा. कुलगुरु यांच्या मंजुरीस पाठवावीत. सदर मंजुरी आल्यानंतर मान्य इतिवृत्त खरेदी समितीच्या पुढील सभेत 'क' प्रस्ताव म्हणून सादर करावेत.

५ लाखाच्या पुढील खरेदी आदेश योग्य त्या सर्व कागदपत्रे व मंजुरीसह खरेदी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करावेत.

६) **मालाचा पुरवठा प्राप्त करणेबाबत - ३१ डिसेंबर, २०२३ :**
मालाबाबत पुरवठाधारकांना खरेदी आदेश दिल्यानंतर (३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत) त्यांच्याकडून जास्तीत जास्त पुढील दोन महिन्यांमध्ये त्या वस्तूंची/मालाची पोहच विद्यापीठास होईल, याची खातरजमा करावी व तशाप्रकारची अट खरेदी आदेशामध्ये टाकावी.

७) परदेशी उपकरणांच्या खरेदीसाठी लागणारा कालावधी लक्षात घेऊन जी उपकरणे आयात करावयाची आहेत, अशी खरेदी प्राधान्याने पूर्ण करण्यात यावी.

८) **उपकरणे/मालाची बिले आदा करणेबाबत – १५ जानेवारी, २०२४ :**
खरेदी केलेली उपकरणे व इतर वस्तू विद्यापीठास ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत प्राप्त झाल्यानंतर त्याची बिले योग्य त्या नोंदी करुन आदा करण्यासाठी वित्त व लेखा विभागाला पाठविणे व ती बिले वित्त विभागाकडून १५ जानेवारी, २०२४ ते ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत आदा होतील याची खातरजमा करावी.

९) जी खरेदी अनुदानातून करावयाची असेल, अशी खरेदी प्रामुख्याने करण्यात यावी. अन्यथा, प्राप्त अनुदान विनीयोगाबाबतची सर्व जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची असेल.

साधारण रक्कम रु. ५ लाखापुढील खरेदी प्रस्ताव खरेदी समितीपुढे जावून मान्य होण्यास बराच कालावधी लागतो. बरेच खरेदी प्रस्तावाचे खर्च त्या त्या वर्षात न पडता पुढील वर्षात खर्ची टाकले जातात. त्यामुळे केलेल्या आर्थिक तरतुदींचा विनियोग न होता तशाच पडून राहतात आणि पुढील वर्षी त्या तरतुदीमधून खर्च पडत असल्यामुळे अधिकचा आर्थिक ताण निर्माण होतो. तसेच खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यामुळे संबंधित आर्थिक वर्षाचे लेखे पूर्ण होण्यास विलंब होतो व पर्यायाने आयकर, वस्तू व सेवा कर इ. कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन होते.

रक्कम रु. १ लाखाच्यावरील खरेदी प्रस्ताव विभागांतर्गत तांत्रिक व सल्लागार समितीकडून खरेदी प्रस्ताव मान्य करुन घ्यावेत. तसेच तांत्रिक व सल्लागार समितीच्या इतिवृत्तामध्ये खरेदीबाबतचे स्पष्ट व योग्य असे समर्थन असावे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये या आर्थिक वर्षीचे (२०२३-२०२४) लेखे विहित वेळेत पूर्ण करावयाचे आहेत. त्यामुळे दि. ३१ मार्च, २०२४ पूर्वी सर्वप्रकारची देयके आदा करणे आवश्यक आहे. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चे कोणतेही कामकाज एप्रिल २०२४ मध्ये चालू राहणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सबब आपणास विनंती की, यापुढे आपले सर्व 'विकास' अर्थशिर्षातर्गत येणारे खरेदी प्रस्ताव आर्थिक वर्षात दि. १५ जानेवारी, २०२४ पूर्वी पूर्ण करावेत. या वेळापत्रकानुसार न आलेल्या खरेदी प्रस्तावांवर वित्त व लेखा विभाग कोणतीही कार्यवाही करणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा. क्र. : वित्त/२०२३-२०२४/४४०
दिनांक : २१/०७/२०२३

सीएनए चारुशीला गायके
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा, प्रस्तुत विद्यापीठ
५. सर्व केंद्रित व विस्तारित वित्त शाखाप्रमुख, वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ